# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.02.2026** **वार:शुक्रवार**

1. औद्योगिक संबंध संहिता दुरुस्ती विधेयकाला संसदेची मंजूरी
2. आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी सरकार कार्यरत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन
3. राज्य सरकारचे टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशनशी 13 सामंजस्य करार
4. छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांचं जागतिक वारसा प्रमाणपत्र यूनेस्कोकडून प्रदान आणि
5. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा नामिबियावर 93 धावांनी विजय

**<u>औद्योगिक संबंध विधेयक</u>**

औद्योगिक संबंध संहिता दुरुस्ती विधेयकाला काल संसदेची मंजूरी मिळाली. काल एकाच दिवसात आधी लोकसभेत आणि त्यानंतर संध्याकाळी राज्यसभेने या विधेयकाला मंजूरी दिली. काल संसदेच्या दोन्ही सभागृहात झालेल्या कामकाजाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**औद्योगिक संबंध संहिता दुरुस्ती विधेयकावर झालेल्या चर्चेला कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दोन्ही सभागृहांमध्ये उत्तर दिलं. चारही कामगार संहितांअंतर्गत 40 वर्षांवरील कामगारांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसंच महिला आणि पुरुष कामगारांना समान कामासाठी समान वेतनाची हमी यात देण्यात आली आहे, असं मांडवीय म्हणाले. प्रत्येक तरुणाला नोकरीबरोबरच नियुक्तीपत्र देण्याची हमीही या कामगार संहितांमध्ये असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. कामगार संहितांच्या विरोधातील भूमिका ही केवळ राजकीय हेतूंनी प्रेरित असल्याचा आरोपही त्यांनी केला.**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर दिलं. आर्थिक वाढ आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी सरकार कार्यरत आहे, असं सीतरामन म्हणाल्या. सरकारला महागाई नियंत्रणात ठेवण्यात तसंच विकासदर कायम ठेवण्यात यश आलं असून देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात असल्याचं त्यांनी सांगितलं. विविध कल्याणकारी योजनांवरील खर्चात कपात केल्याचे विरोधकांचे आरोप त्यांनी फेटाळून लावले. बायोफार्मा, सेमिकंडक्टर मिशन 2.0, वस्रोद्योग आदी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे, तसंच मनुष्यबळाचा विकास करण्यावर सरकारने लक्ष केंद्रित केल्याचं त्यांनी नमूद केलं.**

**दरम्यान भारत अमेरिका व्यापारी करार आणि कामगार कायदे यासह विविध मुद्द्यावरून काल लोकसभेत सत्ताधारी आणि विरोधकांनी गदारोळ केला. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार कराराविरोधात घोषणाबाजी सुरू केली, तसंच हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली. त्यामुळे कामकाज आधी दोन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.**

**लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशनसह विविध संस्थांशी संधान साधत भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा आज अखेरचा दिवस आहे.

**पंतप्रधान-सेवातीर्थ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत सेवा तीर्थ या नवीन सरकारी कार्यालयांच्या संकुलाच्या नावाचं अनावरण आणि कर्तव्य भवन एक आणि दोन, आणि सेवा आणि सेवा तीर्थचं लोकार्पणही करण्यात करण्यात येणार आहे. आज संध्याकाळी सेवा तीर्थवर आयोजित एका सार्वजनिक कार्यक्रमात जनतेला संबोधित करणार आहेत. सेवा तीर्थ संकुलात, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय आहे. हे नवीन संकुल आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये अनेक प्रमुख मंत्रालयांची कार्यालये आहेत.

**स्वयंसेवी संस्था**

विविध स्वयंसेवी संस्थांशी राज्य शासनानं केलेल्या भागीदारीतून राज्याचं वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शासन आणि टाटा ट्रस्ट तसंच नाम फाउंडेशन यांच्यामध्ये काल सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी बोलत होते. या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमाद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना चालना देणं आणि सर्व घटकांपर्यंत प्रमुख योजनांचा लाभ पोहोचवण्याच्या उद्देशानं हा करार करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारण्याला शासनाचं प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. ते म्हणाले.....

**नाना पाटेकरजी मकरंद आणि संपूर्ण नाम च्या टीमचं देखील मनापासून त्यांचे आभार मानतो त्यांनी रिलेंटलेसली अगदी सातत्य ठेवून पाण्याच्या क्षेत्रात शेतीच्या क्षेत्रात ग्रामीण अर्थव्यवस्थेत जे काम केलं आहे हे अत्यंत महत्वाचं आहे. टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशन हे दोन ट्रान्सफॉर्मेशन घडवणारे लोकं एकत्रित आल्यानंतर ट्रान्सफॉर्मेशन ची स्पीड, हे त्या ठिकाणी दुपटीने वाढणार आहे.**

**प्रारूप आराखडा बैठक**

उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. यावेळी पुणे जिल्हा वार्षिक योजना 2026-27 साठी शासनाने प्रस्तावित केलेल्या 1 हजार 32 कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्याला मान्यता देण्यात आली. या व्यतिरिक्त, विविध विभागांकडून 3 हजार 128 कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. या मागण्यांच्या छाननीनंतर 700 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे करण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

2026-27 या वर्षासाठी नांदेड जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत 50 कोटी 63 लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यालाही काल मान्यता देण्यात आली. सोलापूर, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा वार्षिक योजनेच्या 69 कोटी रुपयांच्या आराखड्याला त्याचबरोबर अतिरिक्त 300 कोटी आणि वारीतील कायमस्वरूपीच्या उपायोजनांसाठी 65 कोटी रुपये देण्याची मागणी मुख्यमंत्र्याकडे केली. या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**यूनेस्को**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिलं आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचं अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल युनोस्कोच्या फ्रान्स इथल्या कार्यालयात जाऊन स्वीकारलं. यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्याला शेलार यांनी अभिवादन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य

आणि पराक्रमाची साक्ष देणारे रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी या 12 किल्ल्यांची आता नोंद आता 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना ऊर भरून आला आहे, अशा शब्दात शेलार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

**त्र्यंबकेश्वर दर्शन-नाशिक**

बारा ज्योर्तिलींगापैकी एक असलेलं नाशिक जिल्ह्यातील श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर महाशिवरात्रीला चोवीस तास खुलं ठेवण्यात येणार आहे. महाशिवरात्रीला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे. पुणे जिल्ह्यातील श्री भीमाशंकर मंदिर मात्र दुरुस्तीच्या कामामुळे महाशिवरात्रीला भाविकांना दर्शनासाठी बंद रहाणार आहे.

**संप- नाशिक**

केंद्र शासनाच्या कामगार संहितेच्या विरोधात प्रमुख 14 कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदचे पडसाद काल राज्यातही उमटले. नाशिक, पुणे, गडचिरोली सह अनेक ठिकाणी कामगार संघटनांनी बंद पाळला. अनेक राष्ट्रीयकृत बँकांमधील कर्मचारी संपात सहभागी झाले होते. ठिकठिकाणच्या औद्योगिक वसाहतीत काही कामगार संघटना संपात सहभागी असल्याने उत्पादनावर परीणाम झाला. तसंच, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे  काढण्यात आले.

**वृत्तनिवेदिका माहेश्वरी निधन**

दूरदर्शनच्या माजी वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचं काल निधन झालं. त्या 7० वर्षांच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. त्यांनी दूरदर्शनवर अनेक दशकं वृत्तनिवेदन केलं. जेव्हा खासगी वृत्तवाहिन्यांचं अस्तित्व नव्हतं अशा काळात त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दफेकीनं आणि संयत सादरीकरणानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं होतं.

**अंध क्रिकेट स्पर्धा**

द नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ द ब्लाइंड संस्थेनं आज मुंबईत राज्यस्तरीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. राज्यातील आघाडीचे चार संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**टी-20विश्वचषक**

टी-20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, 'अ' गटाच्या काल नवी दिल्लीत झालेल्या सामन्यात भारताने नामिबिया संघाचा 93 धावांनी पराभव केला. प्रथाम फलंदाजी करताना नामीबियाला 210 धावांचं लक्ष्य दिलं. या आव्हानाचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ 19 व्या षटकांत गुंडाळला गेला. इशान किशनने 24 चेंडूंत 61 धावा फटकावल्या. टी-20 विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात, अर्धशतक झळकावलेला तो पहिलाच भारतीय यष्टीरक्षक ठरला आहे.

या स्पर्धेतील 'ब' गटाच्या काल कँडीत खेळल्या गेलेल्या सामन्यात, श्रीलंकेने ओमानचा 105 धावांनी पराभव केला. मुंबईत झालेल्या सामन्यात इटली संघाने नेपाळचा 10 गडी राखून पराभव केला. या स्पर्धेत आज तीन सामने खेळले जाणार आहेत. पहिला सामना कोलंबोत, ऑस्ट्रेलिया विरुद्ध झिम्बाब्वे, दूसरा सामना नवी दिल्लीत कॅनडा विरुद्ध यू ए ई, आणि तिसरा सामना चेन्नईत अमेरिका विरुद्ध नेदरलँड होणार आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**